कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १२९ /२०२६ दि. २९/०६/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक २९/०६/२०२६ रोजी भन्ते गौतम रत्न थेरो, धम्म प्रसारक यांचे मार्गदर्शनाखाली सकाळी ११.०० वा. डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान ते केडीएमसी कार्यालय असे मोर्चाचे आयोजन केले आहे. सदर मोर्चामध्ये ३००० पर्यत जनसमुदाय सहभागी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) छत्रपती शिवाजी महाराज चौककडुन कल्याण डोंबवली महानगरपालिका समोरून शकंरराव चौक मार्गे गांधी चौक/घेलादेवी चौक कडे व टिळक चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन सरळ पुढे सदानंद चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २)टिळक चौक मार्गे अहिल्यादेवी चौक, शंकरराव चौक मार्गे कल्याण डोंबिवली महानगर पालीका समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अहिल्याबाई चौक** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने अहिल्याबाई चौक येथे डावे वळन घेवुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३)गांधीचौक, घेलादेवी चौक कडुन शंकरराव चौक मार्गे, कल्याण डोंबवली महानगर पालीके समोरून छत्रपती शिवाजी महाराज चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना घेलादेवी चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने घेलादेवी चौक येथे डावे वळन घेवुन इच्छित स्थळी जातील.

**नो पार्कींग –** छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शंकरराव चौक रस्त्याचे दोन्ही बाजुला **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक २९/०१/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन मोर्चा संपे पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त कल्याण डोंबिवली महानगर पालीका

– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ, कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण/कोळशेवाडी/विठठलवाडी/उल्हासनगर वाउपवि.